मुंबई कृषि उत्पन्न बाजार समिती , मुंबई
(राष्ट्रीय महत्वाचा बाजार)
दरपत्रक सूचना

कामाचे नाव :- मुख्यालयातील 16×72 L.G ARIA make EPABX दूरध्वनी यंत्रणेच्या बाह्य वायरिंग (External Telephone cabling) व विकास टप्पा-2 मार्केट-2 येथील CRYSTAL make 2×6 EPABX यंत्रणेचा वार्षिक देखभाल दुरूस्ती ठेका देणे बाबत .

मुंबई कृषि उत्पन्न बाजार समितीच्या मुख्यालयातील 16×72 L.G ARIA make EPABX दूरध्वनी यंत्रणेच्या बाह्य वायरिंग (External Telephone cabling) व विकास टप्पा-2 मार्केट-2 येथील CRYSTAL make 2×6 EPABX यंत्रणेचा **दि.1.12.2026 ते 30.11.2028 या 2** वर्षाच्या कालावधीचा वार्षिक देखभाल दुरूस्ती ठेका द्यावयाचा आहे .याकरिता अशा प्रकारचे दूरध्वनीची बाह्य वायरिंगच्या व 2×6 EPABX यंत्रणेच्या देखभाल दुरूस्तीचे काम करणाऱ्या अनुभवप्राप्त इच्छूक एजन्सीकडून दरपत्रके मागविण्यात येत आहे .सदर कामा बाबतच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे आहेत .

1) इच्छुक एजन्सीची शासकीय नोंदणी **MSME / UDYAM** मध्ये असणे आवश्यक आहे .
2) इच्छुक एजन्सीचे GST नोंदणी असणे आवश्यक आहे
3) इच्छुक एजन्सीने मागील **3** वर्षाचा आयकर तपशील (IT Return) दरपत्रका सोबत जोडणे आवश्यक आहे.
4) इच्छुक एजन्सीला सदर 16×72 L.G ARIA 300 EPABX दूरध्वनीची बाह्य वायरिंगच्या व 2×6 EPABX यंत्रणेच्या देखभाल दुरूस्तीचे काम देखभाल दुरूस्ती करण्याच्या कामाचा कमीत कमी **3** वर्षाचा **अनुभव** असणे आवश्यक आहे .
5) मुख्यालयातील सर्व दूरध्वनी लाईन्सची देखभाल दुरुस्तीची कामे संबंधित कंत्राटदाराने नियमितपणे करणे आवश्यक आहे .
6) मुख्यालयातील दूरध्वनी बंद झाल्याची तक्रार प्राप्त झाल्यानंतर सदर तक्रारीचे निवारण 4 तासांच्या आत संबंधित कंत्राटदाराने करणे आवश्यक आहे .
7) मुख्यालयातील दूरध्वनी केबलिंग मध्ये बदल करावयाचा झाल्यास समितीच्या संबंधित अधिकारी / कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून करण्यात यावा .
8) विकास टप्पा-2 मार्केट-2 येथील CRYSTAL make 2×6 EPABX यंत्रना सुरळीत सुरू राहण्याकरिता नियमितपणे सदर यंत्रणेची देखभाल दुरूस्ती करावी आणि सदर यंत्रने बाबत तक्रार प्राप्त झाल्यानंतर सदर तक्रारीचे निवारण 4 तासांच्या आत संबंधित कंत्राटदाराने करणे आवश्यक आहे . तसेच काही कारणास्तव सदर यंत्रणा दुरूस्ती करिता 1 दिवसापेक्षा जास्त वेळ लागणार असल्यास तात्पुरती STANDBY यंत्रणा संबंधित कंत्राटदारास बसवून द्यावी लागेल .

याकामासंबंधी अधिक माहिती आवश्यक असल्यास इच्छुक कंत्राटदारांनी उपसचिव ,संगणक विभाग यांच्याकडे संपर्क साधावा .सदर कामाकरिता दरपत्रक सादर करण्याचा कालावधी दिनांक. 03/11/2026 ते 18/11/2026 पर्यन्त राहील . एजन्सीधारकांने दरपत्रकासोबत त्याचे सदर प्रकारच्या कामाचे अनुभवाबाबतची कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे .

सचिव
मुंबई कृषि उत्पन्न बाजार समिती , मुंबई

Scanned with OKEN Scanner